Estd. 1962
"A++" Accreditd by NAAC (2021)With CGPA 3.52
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
परिपत्रक
४०/२०२५

**विषय :- विद्यापीठातील संविधानिक अधिकारी, वर्ग १ चे अधिकारी व समकक्ष अधिकारी यांच्या रजा / हजर निवेदन ऑनलाईन संगणक प्रणालीद्वारे सादर करणेबाबत...**

विद्यापीठातील संविधानिक अधिकारी (मा.संचालक-परीक्षा व मुल्यमापन मंडळ आणि मा. वित्त व लेखा अधिकारी), वर्ग १ चे अधिकारी व समकक्ष अधिकारी यांना कळविण्यात येते की, विद्यापीठातील संविधानिक अधिकारी (मा.संचालक-परीक्षा व मुल्यमापन मंडळ आणि मा. वित्त व लेखा अधिकारी), वर्ग १ चे अधिकारी व समकक्ष अधिकारी यांच्या रजा ( किरकोळ/अर्जित/वैद्यकीय) व हजर निवेदन ऑनलाईन संगणक प्रणालीद्वारे सादर करण्यासाठी आस्थापना विभागाने संगणक केंद्रामार्फत ऑनलाईन संगणक प्रणाली विकसीत केलेली आहे. सदर संगणक प्रणालीद्वारे विद्यापीठातील आस्थापना एक (०१) विभागाशी संबंधीत असणा-या संविधानिक अधिकारी(मा.संचालक-परीक्षा व मुल्यमापन मंडळ आणि मा. वित्त व लेखा अधिकारी), वर्ग १ चे अधिकारी व समकक्ष अधिकारी यांनी रजा (किरकोळ/ अर्जित/वैद्यकीय) व हजर निवेदन ऑनलाईन संगणक प्रणाली मधून सादर करावेत.

दि. ०१ सप्टेंबर, २०२५ पासून सर्व प्रकारच्या रजा व हजर निवेदन हे ऑनलाईन संगणक प्रणाली मधून स्विकारण्यात येत आहेत. सदरची ऑनलाईन प्रणाली पूर्णपणे कार्यान्वीत होईतोपर्यंत संबंधीतांनी ऑनलाईन संगणक प्रणाली मधून रजा भरून त्याची प्रिंट काढून रजा अर्जावर रजेच्या कालावधीत आपल्या कडील पदाचा कार्यभार अन्य कोणत्या समकक्ष अधिकारी यांच्या कडे सोपविण्याबाबत रितसर शिफारस करून मा. कुलगुरूसो/ मा.प्र-कुलगुरूसो व मा. कुलसचिव यांच्या मार्फत आस्थापना विभागास सादर करावी. शिफारशीनुसार संबंधीत अधिकारी यांचा रजेच्या कालावधीचा कार्यभार कोणाकडे द्यावयाचा याबाबत मा. कुलगुरूसो/ मा.प्र-कुलगुरूसो/ मा. कुलसचिव यांच्या कडून निर्णय अंतिम झालेनंतर आपणांस कळविण्यात येईल. त्यानंतर संबंधितांनी रितसर चार्ज देऊनच रजेवर जावे.

उपरोक्त कार्यपद्धतीनुसारच रजा अर्ज सादर करावेत. ई-मेल अथवा सोशल मिडीया माध्यमाद्वारे कळविलेल्या रजेबाबत कार्यवाही केली जाणार नाही/ रजा ग्राह्य धरली जाणार नाही. याची संबंधीतांनी नोंद घ्यावी.

सोबत लॉगींन व पासवर्ड तयार करण्याबाबत आणि रजा व हजर निवेदन संगणक प्रणालीमध्ये नोंद करण्याबाबतची माहिती जोडलेली आहे. सदर संगणक प्रणालीची लिंक पुढील प्रमाणे
**https://sukapps.unishivaji.ac.in/section-pro/#/login**

**(डॉ. व्ही.एन.शिंदे)**
**कुलसचिव**

**संदर्भ क्र.: शिवाजी विद्यापीठ/आस्थापना/1898**
**दिनांक :** 18 SEP 2025

१. सर्व अधिविभागप्रमुख/संचालक/समन्वयक/प्रशासकीय अधिकारी, प्रशासकीय विभागप्रमुख व सेवक.
२. मा.कुलगुरू, मा.प्र-कुलगुरू, मा.कुलसचिव, मा. अधिष्ठाता, मा.संचालक परीक्षा व मुल्यमापन मंडळ, मा.वित्त व लेखा अधिकारी, यांचे कार्यालय
३. इंटरनेट विभाग - सदरचे परिपत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.
- यांना माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी.

Vishwajit/E:/Circular/class 1